

# श्री संत नामदेव अभंगवाणी-रात्र काळी घागर काळी

https://www.chalisa.online

रात्र काळी घागर काळी ।
यमुनाजळें ही काळी वो माय ॥१॥

बुंथ काळी बिलवर काळी ।
गळां मोतीं एकावळी काळीं वो माय ॥२॥

मी काळी कांचोळी काळी ।
कांस कांसिली ते काळी वो माय ॥३॥

एकली पाण्याला नवजाय साजणी ।
सवें पाठवा मूर्ति सांवळी वो माय ॥४॥

विष्णुदास नाम्याची स्वामिणी काळी ।
कृष्णमूर्ति बहु काळी वो माय ॥५॥

|| https://www.chalisa.online ||